महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती, पुणे.
GOVERNMENT AYURVED COLLEGE & HOSPITAL, BARAMATI, PUNE.

Email ID – gacbaramati@gmail.com / gahbaramati@gmail.com Contact No. १०७५१२३२८८.

जा.क्र.शाआमरुबा/मौ.मेडद-बारामती/अति.जमिन-ताबा/ २१८-२१९ /२०२२, दि. २२-०६-२०२२

प्रति,
मा.संचालक,
आयुष संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती, पुणे च्या विस्तारीकरणासाठी मौजे मेडद, ता.बारामती, जि.पुणे येथील जमीन गट नंबर ४१४/२ मधील ६.०० हे. ०० आर. इतकी शासकीय जमीन प्रदान करणेबाबत. जमीनीचा ताबा घेणेबाबत.

संदर्भ :- संचालक, आयुष संचालनालय, महा.राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.आसंमुं/शाआम/मौ.मेडद-बारामती/अति.जमिन-ताबा/२०२२/आयु-२/६६६२, दि.१६-०६-२०२२.

मा.महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भित पत्रामध्ये नमूद केल्यानुसार मी दि.१७-०६-२०२२ रोजी मा. संचालक, आयुष संचालनालय, महा.राज्य, मुंबई यांचे वतीने बारामती, पुणे येथे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती, पुणे च्या विस्तारीकरणाअंतर्गत लागणारी मौजे मेडद, ता.बारामती, जि. पुणे येथील जमीन गट नंबर ४१४/२ मधील ६ हे. ०० आर या शासकीय जमीनीचा ताबा घेण्यांकरीता उपस्थित होतो.

तरी आपण संदर्भित पत्रात सुचित केल्यानुसार आवश्यक त्या विहित बाबींची पूर्तता करुन सदर जमिनीचा ताबा घेण्यांत आलेला आहे. सोबत जमिनीसंबंधीची सर्व प्राप्त कागदपत्रे (ताबा पावती, पंचनामा, सातबारा, फेरफार नोंदवही गांव नमुना-६, प्रपत्र-क, केलेले हमी पत्र) जोडलेली आहेत.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त संचालनालयास उद्येशुन लिहिलेले जमीन प्रदान केल्याबाबतचे पत्राची मुळ प्रत दि.१४-०६-२०२२ सोबत जोडली आहे. तसेच मा.तहसीलदार, बारामती यांचे ताबा दिल्याचे पत्र दि.२१-०६-२०२२ ची मुळ प्रत सोबत जोडली आहे. तसेच जमीनीच्या ताबा संबंधीची सर्व मुळ कागदपत्रे मा.तहसीलदार कार्यालय, बारामती यांचे कार्यालयास उपलब्ध आहेत.

उपरोक्त सर्व कागदपत्रे या पत्रासोबत संचालनालयास माहिती तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर करीत आहे.

आपला विश्वासु,

(वैद्य अनिल काळे,)
प्राध्यापक, बालरोग,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद.

प्रत :-
मा.अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती, पुणे, यांना सदर जमीनीसंबंधीची सर्व प्राप्त कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीसह प्रत सादर.

Dean
Govt. Ayurved College & Hospital
Baramati, Dist. Pune

तहसिलदार बारामती यांचे कार्यालय

नवीन प्रशासकीय भवन, इंदापूर रोड, बारामती-४१३१०२ फोन नं. ०२११२ २२४३८६
ई-मेल tahsildarbmt@gmail.com

तहसिल कार्यालय बारामती
क्र. जमीन/कावि/११४२/२०२२
दिनांक. २१ /०६ /२०२२

प्रति,

मा. संचालक आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई
तर्फे डॉ. अनिल भिकाचंद काळे

विषयः शासकीय आयुर्वेद महाविद्यालय बारामती व संलग्नित रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी अतिरिक्त जमीन उपलब्ध करुन देणेबाबत. मौजे मेडद ता. बारामती येथील जमीन गट नं. ४१४/२ मधील ०६ हे. ०० आर इतकी शासकीय जमीन प्रदान करण्याबाबत.

संदर्भः मा. जिल्हाधिकारी सो पुणे यांचेकडील आदेश क्र. जमीन/बारामती/सीआर/०८/२२ दिनांक १४/०६/२०२२

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन सादर करणेत येंते की, मौजे मेडद ता. बारामती येथील शासकीय जमीन गट नं. ४१४/२ मधील क्षेत्र ०६ हे. ०० आर या शासकीय जमीनीचा ताबा शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय संलग्नित रुग्णालय मेडद ता. बारामती करीता मा. संचालक आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई तर्फे डॉ. अनिल भिकाचंद काळे, प्राध्यापक शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद यांना ताबा दिला असून सोबत ताबेपावती, पंचनामा व ७/१२ उतारा, आठ अ जोडला असून पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी आपणास सविनय सादर करीत आहे.

आपला विश्वासू

तहसिलदार बारामती

Dean
Govt. Ayurved College & Hospital.
Baramati, Dist. Pune

ताबेपावती

ताबेपावतीलिहूनदेणार– मंडल अधिकारी उंडवडी क.प
ता.बारामती.जि . पुणे(महाराष्ट्र)

ताबेपावतीलिहूनघेणार– शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय मेडद ता. बारामती करीता मा. संचालक आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई तर्फे डॉ अनिल भिकाचंद काळे प्राध्यापक शासकीय आयुर्वेद महाविद्यालय उस्मानाबाद.

कारणे ताबे पावती लिहून देतो कि,महाराष्ट्रशासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासनजापन क्र जमीन 3421 /1325/ प्रक्र283 / ज.५दिनांक – 10/06/2022 मा . जिल्हाधिकारीसो. पुणे (महसूलशाखा) यांचेकडील आदेश क्रमांक–जमीन /बारामती / सीआर /08/2022 दिनांक–14/06/2022 लगत मा. तहसीलदार.सो.ता.बारामती./कावी/1039/2022 दिनांक16/06/2022 बारामती.जि.पुणे (महाराष्ट्र) गाव मौजे मेडद येथील जमीन गट.नं 414/2 मधील पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडल (म्हाडा)पुणे असलेल्या 06 हेक्टर00आर इतकी जमिनीचा ताबा शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयासाठी देणेचा आहे. उपरोक्त शासन जापन व मा जिल्हाधिकारी सो पुणे यांचेकडील व मे. तहसीलदार सो. बारामती यांचेकडील पत्रान्वये सदर क्षेत्र 06 हेक्टर 00आर जमिनाचा ताबा आज दिनांक17/06/2022 रोजी दुपारी 2:14 वाजता मंडल अधिकारी उंडवडी क.प.ता. बारामती.जिल्हा.पुणे(महाराष्ट्र) यांनी गट नं.414/2 मधील पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडल (म्हाडा)पुणे यांचेकडून काढून घेऊन तो पंचासमक्ष पंचनाम्यात नमूद केले प्रमाणे मा.संचालक आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई तर्फे डॉ अनिल भिकाचंद काळे; प्राध्यापक शासकीय आयुर्वेद महाविद्यालय. उस्मानाबाद यांना दिला व घेतला असे ताबे पावती दिली.

दिनांक:- 17/06/2022

ताबेपावतीलिहूनदेणार

17/6/2022

तलाठी
मेडद वन्हाणपूर नेपतवळण
ता.बारामती, जि.पुणे

ताबेपावतीलिहून घेणार

17/06/2022
डॉ. अनिल भिकाचंद काळे
प्राध्यापक, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय
उस्मानाबाद

Dean
Govt. Ayurved College & Hospital.
Baramati, Dist. Pune

पंचनामा

आम्ही खालील सह्या करणार पंचलोक सर्व राहणार मेडद ता.बारामती जि . पुणे(महाराष्ट्र)कारणे पंचनामा लिहून देतो कि, आज दिनांक–17/06/ 2022 रोजी मंडलअधिकारी उंडवडी क.प ता .बारामती जि पुणे (महाराष्ट्र) यांनी बोलवल्यावरून व सांगितल्यावरून 1) मा.जिल्हाधिकारीसो. पुणे (महसूलशाखा) यांचेकडील आदेश क्रमांक–जमीन /बारामती / सीआर /08/2022 दिनांक–14/06/2022, 2)महाराष्ट्रशासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासनज्ञापन क्र जमीन 3421 /1325/ प्रक्र 283 / ज.५दिनांक – 10/06/2022 ,3) मा. तहसीलदार.सो.ता.बारामती./कावी/1039/2022 दिनांक16/06/2022 अन्वये मा.संचालक आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई तर्फे डॉ अनिल भिकाचंद काळे; प्राध्यापक शासकीय आयुर्वेद महाविद्यालय. उस्मानाबाद यांना ताबा देण्यासाठी बारामती.जि.पुणे (महाराष्ट्र) मौजे मेडद येथील जमीन गटनं 414/2 क्षेत्र 6 हेक्टर 00 आर मध्ये समक्ष सध्यस्थितीचा पंचनामा लिहून देतो की,मौजे मेडद ता.बारामती जि.पुणे जमीन गटनं 414/2 क्षेत्र 6 हेक्टर 00 आर ची चतु:सिमा खालील प्रमाणे सदर क्षेत्र पड आहे .

पूर्व :- मौजे मेडद गट नं 414/1

दक्षिण :- गटातील बारामती – तालुका खरेदीविक्रीसंघ यांचे क्षेत्र

पश्चिम :- बारामती – मोरगाव रस्ता

उत्तर :- गटनं 413 , 414 व 415

हा पंचनामा आज दुपारी 2 :14 वाजता करून दिला तो वाचून दाखविला व वाचून पहिला तो बरोबर असे.

दिनांक – 17/06/2022

समक्ष

पंच

1)

2)

17/6/2022

मंडलअधिकारी उंडवडीक.प

तलाठी

मेडद बन्हाणपूर

ता.बारामती,जि.पुणे

Dean
Govt. Ayurved College & Hospital
Baramati, Dist. Pune

वर्ष:2021-22

गाव नमुना आठ-अ
धारण जमिनींची नोंदवही (कृषिक)
(आसामीवार खतावणी -- जमाबंदी पत्रक)

6/17/2022

गाव: मेडद

तालुका: बारामती

जिल्हा: पुणे

गाव नमुना सहा मधील नोंद	भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक	क्षेत्र			वसुलीसाठी				एकूण
		लागवडी योग्य क्षेत्र	पोटखराब क्षेत्र	एकूण क्षेत्र	आकारणी किंवा जुडी	दुमाला जमिनीवरील नुकसान.	स्थानिक उपकर		
		(हे.आर.चौ.मी)	(हे.आर.चौ.मी)	(हे.आर.चौ.मी)			जि.प.	ग्रा. प.	
(१)	(२)	(३अ)	(३ब)	(३क)	(४)	(५)	(६अ)	(६ब)	(७)
खाते क्रमांक 5451	शासकीय आयुर्वेद महाविद्यालय संलग्नीत मा.संचालक,आयुष,संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई .								
व्यक्तिगत खातेदार	414/1	5.87.00	0.0000	5.87.00	0	0	0	0	0
	414/2	6.00.00	0.0000	6.00.00	0	0	0	0	0
	एकूण	**11.87.00**	**0.0000**	**11.87.00**	**0**	**0**	**0**	**0**	**0**

"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."
दिनांक :- 17/06/2022
सांकेतिक क्रमांक :- 27250013031743000062022277

तलाठी
(नाव :- बाळासाहेब श्रीपती वनवे)
तलाठी सजा कऱ्हाटी मंडळ :- बारामती जि :-पुणे
ता.बारामती, जि.पुणे

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune

अहवाल दिनांक : 17/06/2022

महाराष्ट्र शासन

गाव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक)

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

गाव :- मेडद (556904) तालुका :- बारामती जिल्हा :- पुणे

गट क्रमांक व उपविभाग : 414/2

भू-धारणा पध्दती : भोगवटादार वर्ग -1 शेताचे स्थानिक नाव :

क्षेत्र, एकक व आकारणी	खाते क्र.	भोगवटादाराचे नांव	क्षेत्र	आकार	पो.ख.	फे.फा.	कुळ, खंड व इतर अधिकार
क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी	[3093]	~~[पुणे गृहनिर्माण व वो.विकास मंडळ (म्हाडा) पुणे~~	~~6.00.00~~		]	(11395)	कुळाचे नाव व खंड
अ) लागवड योग्य क्षेत्र जिरायत 6.00.00 बागायत -	[4968]	~~[विजया कांतीलाल खोलणे~~	~~0.00.65~~		]	(11143)	इतर अधिकार
एकुण 6.00.00 ला यो क्षेत्र	5451	शासकीय आयुर्वेद महाविद्यालय संलग्नीत मा.संचालक,आयुष,संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई	6.00.00			(11395)	प्रलंबित फेरफार : नाही.
ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य) वर्ग (अ) - वर्ग (ब) -							शेवटचा फेरफार क्रमांक : 11395 व दिनांक 17/06/2022
एकुण पो.ख. 0.00.00							
एकुण क्षेत्र 6.00.00 (अ+ब)							
आकारणी 0.00							
जुडी किंवा विशेष आकारणी -							
जुने फेरफार क्र. (5878)(6029)(9719)(9786)(11143)							सीमा आणि भूमापन चिन्हे :

गाव नमुना बारा (पिकांची नोंदवही)

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ यातील नियम २९]

गाव :- मेडद (556904) तालुका :- बारामती जिल्हा :- पुणे

गट क्रमांक व उपविभाग : 414/2

			पिकाखालील क्षेत्राचा तपशील									लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन		जल सिंचनाचे साधन	शेरा
			मिश्र पिकाखालील क्षेत्र					निर्भेळ पिकाखालील क्षेत्र							
						घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र									
वर्ष	हंगाम	खाता क्रमांक				पिकाचे नाव	जल सिंचित	अजल सिंचित	पिकाचे नाव	जल सिंचित	अजल सिंचित	स्वरूप	क्षेत्र		
(१)	(२)	(३)	*४	*५	*६	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)	(१५)	(१६)
							हे.आर. चौ.मी	हे.आर. चौ.मी		हे.आर. चौ.मी	हे.आर. चौ.मी		हे.आर. चौ.मी		
2020-21	संपूर्ण वर्ष											झाडी पड	5.0000		

टीप : *४ - मिश्रणाचा संकेत क्रमांक, *५ - जल सिंचित, *६ - अजल सिंचित

"शासकीय कामासाठी निशुल्क प्रत."
दिनांक :- 17/06/2022
सांकेतिक क्रमांक :- 27250013631743000062022127 6

(नाव :- बाळासाहेब भीमराव कनवे)
तलाठी, साझा :- मेडद ता. :- बारामती जि :- पुणे

Dean
Govt. Ayurved College & Hospital
Baramati, Dist. Pune

गाव नमूना ६
फेरफार नोंदवही (फेरफार पत्रक)
[महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम १०]

गाव :- मेडद तालुका :- बारामती जिल्हा :- पूणे

नोंदीचा अनुक्रमांक	संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप	परिणाम झालेले भुमापन व उपविभाग क्रमांक	अधिकाऱ्याचे नाव , आद्याक्षरी व शेरा
11395	फेरफाराचा प्रकार : अनोंदणीकृत नोंदीचा प्रकार : आदेश व दस्तावेज फेरफाराचा दिनांक : 17/06/2022 माहिती मिळालेचा दिनांक :- 17/06/2022 अधिकारी : जिल्हाधिकारी आदेश क्रमांक : आदेश क्रमांक.जमीन /बारामती /सीआर/08/2022 दिनांक : 14/06/2022 महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन ज्ञापन क्र.जमीन 3421/1325/प्र.क्र.283/ज-5, अन्वये व मा.जिल्हाधिकारी सो.पुणे यांच्याकडील आदेश क्रमांक.जमीन /बारामती /सीआर/08/2022 दिनांक - 14/06/2022 अन्वये व लगत मे.तहसिलदार सो.बारामती यांच्याकडील पत्र क्रमांक.जमीन /कावि/1039/2022 दिनांक.16/06/2022 अन्वये मौजे मेडद ता.बारामती जि.पुणे येथील जमीन गट नंबर.414/2 मधील पुणे ग्रहनिर्माण व क्षेत्रविकास मंडल (म्हाडा)पुणे यांचे नावे असलेल्या क्षेत्र 06 हे 00 आर या क्षेत्राचा ताबा मंडलअधिकारी उंडवडी क.प.यांनी काढून घेऊन तो मा.संचालक,आयुष,संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या तर्फे डॉ.अनिल भिकाचंद काळे प्राध्यापक शासकीय आयुर्वेद महाविद्यालय उस्मानाबाद यांना दिनांक .17/06/2022 रोजी पंचनाम्याने व ताबेपावतीने दिला आहे.त्यामुळे मौजे मेडद ता.बारामती जि.पुणे येथील जमीन गट नंबर.414/2 मधील पुणे ग्रहनिर्माण व क्षेत्रविकास मंडल (म्हाडा)पुणे यांचे नाव कमी करून 06 हे 00 आर क्षेत्रास शासकीय आयुर्वेद महाविद्यालय तर्फे मा.संचालक,आयुष,संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे नाव दाखल केले असे. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन ज्ञापन क्र.जमीन 3421/1325/प्र.क्र.283/ज-5, अन्वये व मा.जिल्हाधिकारी सो.पुणे यांच्याकडील आदेश	414/2 एकूण :- 1	आदेशाची प्रत पाहिली आहे.महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन ज्ञापन क्र.जमीन 3421/1325/प्र.क्र.283/ज-5, अन्वये व मा.जिल्हाधिकारी सो.पुणे यांच्याकडील आदेश क्रमांक.जमीन /बारामती /सीआर/08/2022 दिनांक -14/06/2022 अन्वये व लगत मे.तहसिलदार सो.बारामती यांच्याकडील पत्र क्रमांक.जमीन /कावि/1039/2022 दिनांक.16/06/2022 अन्वये नोंद प्रमाणित (शबाना बाबासाहेब बागवान) मंडळ अधिकारी:- उंडवडी क.प. ता.: बारामती जि.: पुणे दि.: 17/06/2022 Dean Govt. Ayurved College & Hospital, Baramati, Dist. Pune

	क्रमांक.जमीन /बारामती /सीआर/08/2022 दिनांक - 14/06/2022 अन्वये अन्वये व सगत मे.तहसिलदार सो.बारामती यांच्याकडील पत्र क्रमांक.जमीन /कावि/1039/2022 दिनांक.17/06/2022 अन्वये पंचनामा व ताबेपावतीवरून नोंद केली असे.सदर क्षेत्र ते भोगवटदार वर्ग -2 म्हणून धारण करतील . आदेश ,पंचनामा व ताबेपावती फायलीस असे. हितसंबंधितांना नोटीस बजावल्याचा दि. 17/06/2022 फेरफार नोंद निर्गतीचा दि. 17/06/2022 (बाळासाहेब श्रीपती वनवे) तलाठी मेडद साझा मेडद ता. बारामती जि. पुणे		

"वा प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."
दिनांक :- 17/06/2022
सांकेतिक क्रमांक :- 27250013031743000062022327 8

(नाव :- बाळासाहेब श्रीपती वनवे)
तलाठी साझा :- मेडदता :- बारामती जि :-पुणे
तलाठी
मेडद व-हाणपूर मंडळ
ता.बारामती,जि.पुणे

Dean
Govt. Ayurved College & Hospital.
Baramati, Dist. Pune



मौजे : मेडद
तालुका : बारामती
जिल्हा : पुणे

मोजणीचा आराखडा : अर्जदार मे. श्री. प्रवुध गंधनालय महाराष्ट्र पुणे यांनी मौजे मेडद ता. बारामती जि. पुणे येथील ग.नं.४१४.१ ये मोजणी करणे कामी केलेल्या अर्जावरून मोजणी करणे.

पोटहिस्सा तपशील :

या प्रकारचे ग.नं.ची हद्द गुळ गर्दे अभिनेत्री प्रकारचे असे

या प्रकारचे अर्जदार यांनी मोजणीसाठी दाखविलेली वहिवाट असे.

या प्रकारचे जागेवर बारामती-पुणे महामार्ग असे.

या प्रकारचे जागेवर रस्ता असे.

या प्रकारचे मे. प्रवुध गंधनालय महाराष्ट्र पुणे यांची वापरवीची प्रस्तावित जागा असे.

या प्रकारचे मे. प्रवुध गंधनालय महाराष्ट्र पुणे यांची भागीदारीतील वाटीव जागा असे.

टिप :

N

स्केल १:१000

मोजणी करणार : श्री महादू के. बी.
(भूकरमापक)

मोजणी दिनांक : / १० /२०२१

Dean
Govt. Ayurve[illegible] College & Hospital,
B[illegible]

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ 09AA 406760

अनुक्रमांक 7959 दिनांक: 9/6/22 रुपये: 900

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे पावती

संबंध मुद्रांक अधिनियम १९५८ च अनुच्छेद क्र.

मुद्रांक वापरणाऱ्याचे नाव अनिल भिकाचंद काळे

मी घेतला

व्यक्तीचे नाव बारामती

चेतन शिंदे

परवानाधारी/हस्त पत्रकाची सही

परवानाधारी

परवाना क्रमांक 22030

परवान्याची मुदत 05/2022

परवाना धारकाचे नाव

6 JUN 2022

प्रतिज्ञापत्र.

मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. बारामती, जि. पुणे यांचे समोर.

ॲफीडेव्हीट करणार:— मी **डॉ.अनिल भिकाचंद काळे** प्राध्यापक, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय उस्मानाबाद, या पदावर मागील दहा वर्षापासून कार्यरत असून मा.संचालक, **आयुष** संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या तर्फे खालीलप्रमाणे हमीपत्र लिहुन देतो की,

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune

शासन ज्ञापन दि.१०/०६/२०२२ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२—अ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ च्या नियम ५ व ६ मधील तरतुदीनुसार मौजे मेडद, ता.बारामती, जि.पुणे येथील गट नं.४१४/२ मधील ६ हे. ०० आर इतकी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) पुणे यांच्याकडून जमीन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागास (संचालक, आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांना बारामती, जि.पुणे येथे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित १०० रूग्णखाटांचे आयुर्वेद रूग्णालय स्थापणकरणे करिता महसूल मुक्त किंमतीने व भोगवटामुल्यरहित पध्दतीने कब्जेहक्काने खालील नमूद अटी व शर्तीस अधिन राहून प्रदान करण्यास मान्यता दिलेली आहे.

अटी व शर्ती

१ विषयांकित जमीन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागास (संचालक, आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई) हे भोगवटादार वर्ग २ म्हणून धारण करतील.

२ शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पुर्व परवानगीशिवाय सदर जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबंध विक्री/देणगी देऊन/अदला बदल करून गहाण ठेऊन/पट्टयाने देऊन/खाजगी—सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाह्य यंत्रणेद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करता येणार नाही. सदर जमिनीवर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती/संस्था/कंपनी इत्यादीचे कोणत्याही प्रकारे हक्क शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पुर्वमान्यतेशिवाय सदर जमिनीचे पोट विभाजन करता येणार नाही.

३ वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग (संचालक, आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई) हे विषयांकित शासकीय जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठी करतील. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीची अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरूपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पूर्वमान्यता आवश्यक राहील.

४ विषयांकित जमिनीची मोजणी व डिमार्केशन, प्रतिग्रहिता विभागाने संबंधित उप—अधिक्षक, भूमी अभिलेख यान्याकडून करणे बंधनकारक राहील.

५ विषयांकित जमिनीवर संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या विहित परवानगीने व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास होणे बंधनकारक राहील. तसेच या व्यतिरिक्त अन्य संबंधित विभाग/शासकीय यंत्रणा यांची मान्यता/पुर्वपरवानगी/नाहरकत घेणे देखील बंधनकारक राहील.

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune

६. सदर जमिनीचा ताबा मिळल्यापासुन ३ वर्षाच्या आत मंजुर प्रयोजनासाठी वापर सुरू करणे बंधनकारक राहील.

७. सदर जमिनीवरील नियोजित प्रयोजनामुळे लगतच्या खातेदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. वा त्याच्या वैध वहिवाटीस बाधा येणार नाही. याबाबत आवश्यक ती दक्षता प्रतिग्रहित विभागाने घ्यावयाची आहे.

८. सदर जमीन गायरान संवर्गातील असुन तिचा शासन मान्यतेने अन्य शासकीय/सार्वजनिक प्रयोजनासाठी वापर होणार असल्याने सदर जमीन गायरान संवर्गातुन कमी करण्याबाबत तसेच अधिकार अभिलेखामध्ये तदनुषंगिक नोंदी घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी

९. उक्त जमिनीस शासकीय जमीन मंजुरी संदर्भात इतर नियमित अटी व शर्ती या ठिकाणी लागु आहेत.

१०. प्रस्तुत जमिनीचे संरक्षण देखभाल करण्याची जबाबदारी प्रतिग्रहीत यांची राहील.

११. पर्यावरणाच्या पुर्नस्थापनेसाठी व पर्यावरण संतुलन कायम राखण्याच्या दृष्टीने विषयांकित जागेत आवश्यक तेथे वृक्ष लागवण करणे बंधनकारक राहील.

१२. विषयांकित जागेबाबत महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील. शासन परिपत्रक क्र. मुद्रांक–२०१७/अनौ क्र.११ /प्र.क्र.१३३/म–१ (धोरण) दि.२४/१२/२०२० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्रहित यांचेवर बंधनकारक राहील.

१३. प्रतिग्रहित यांनी उक्त जमीन ताब्यात घेतल्यानंतर नमुना –१८ प्रमाणे जागेवर नावाचा बोर्ड लावणे बंधनकारक राहील.

१४. विषयांकित जमीन अथवा जमीनीचा भाग शासनाच्या महात्वाच्या प्रयोजनासाठी आवश्यक वाटल्यास प्रतिग्रहीत यांना पुर्व कल्पना न देता विनाशर्त व विनामोबदला परत काढून घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

१५. प्रतिग्रहित्याने उपरोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास जमीन विना मोबदला सरकार जमा होण्यास पात्र राहील.

सदरचे प्रतिज्ञापत्रातील संपूर्ण मजकुर खरा व बरोबर असून तो खोटा आढळून आल्यास आम्ही भा.द.वि. संहिता कलम १९९, २००, १९३/२ नुसार होणाऱ्या शिक्षेस व दंडास पात्र राहीन याची सुध्दा जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : १७/०६/२०२२

प्रतिज्ञापत्र करणार

ओळख :

Dr. Chetan Krishna Shingane
17/06/2022.

Sr.No. : 2556
Date : 17/06/2022

Executive Magistrate
Baramati (Dist. Pune)

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune

वाचले:-१) संचालक आयुष, आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र. आसंमु/नविन शा.आयु.महावि./बारामती/जागा/२०२१/आयु-२/१००३६ व १००३७, दि. ०५/०८/२०२१ व दि. ०७/०९/२०२१.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग शासन निर्णय क्र. एमएमसी-२०२१/प्र.क्र.१४७/२१/शिक्षण-१, दि. २०/०७/२०२१

३) मा. विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडील पत्र क्र. मह/२/जमीन-पुणे/एसआर/५३/२०२१ दि. १८/११/२०२१ व दि. १८/०२/२०२२.

४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन ज्ञापन क्र. जमीन-३४२१/५९४/प्र. क्र. १२९/ज-५, दि. ०६/१०/२०२१.

५) या कार्यालयाकडील आदेश क्र. पमअ/सीआर/१३/२०२१, दि. ०८/१०/२०२१.

६) या कार्यालयाकडील आदेश क्र. पमअ/सीआर/३९६/२००२, दि. १८/०६/२००२.

७) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एलजीएल १०८१/८७४४/सीआर.१४४७/ग-५, दि. १६/०२/१९८५

८) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. जमीन ०४/२००६/प्र.क्र.३५/ज-१, दि. ०८/०९/२००८.

९) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१, दि. १२ जुलै, २०११

१०) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २२-अ व कलम ४०.

११) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ च्या नियम ५ व ६

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
महसूल शाखा
क्र. जमीन/बारामती/सीआर/०८/२०२२
दि. १४/०६/२०२२

विषय :- जमीन-पुणे.

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती व संलग्नित रूग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी अतिरिक्त जमीन उपलब्ध करून देणेबाबत.. मौजे मेडद, ता. बारामती, जि. पुणे येथील जमीन गट नंबर ४१४/२ मधील ०६ हे ०० आर इतकी शासकीय जमीन प्रदान करण्याबाबत..

आदेश

ज्याअर्थी, मौजे मेडद, ता. बारामती, जि. पुणे येथील जमीन गट नंबर ४१४/२ मधील ०६ हे ०० आर जागेत नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयाच्या विस्तारिकरणासाठी मिळणेबाबत संचालक, आयुष, संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र. आसंमु/नविन शा.आयु.महावि./बारामती/जागा/२०२१/आयु-२/१००३६ व १००३७, दि. ०५/०८/२०२१ व दि. ०७/०९/२०२१ अन्वये विनंती केलेली आहे.

३. ज्याअर्थी, जिल्हाधिकारी कार्यालयाकडील पत्र क्र. जमीन/बारामती/कावि/५४५/२०२१, दि. १६/११/२०२१, क्र. जमीन/बारामती/कावि/५४/२०२२, दि. १४/०२/२०२२ व क्र. जमीन/बारामती/कावि/२६१/२०२२, दि. ०८/०६/२०२२ लगत मा. विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडील पत्र क्र. मह/२/जमीन-पुणे/एसआर/५३/२०२१, दि. १८/११/२०२१ व दि. १८/०२/२०२२ अन्वये शासनास अहवाल सादर करणेत आला होता.

४. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन ज्ञापन क्र. जमीन ३४२१/१३२५/प्र.क्र.२८३/ज-५, दि. १०/०६/२०२२ अन्वये, संचालक आयुष, आयुष संचालनालय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या सदर जागा मागणीच्या पार्श्वभुमीवर विभागीय आयुक्त, पुणे यांनी कळविल्यानुसार पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांना संदर्भाधीन क्र. ४ वरील कार्यालयीन आदेशाव्दारे प्रदान केलेली मौजे मौजे मेडद, बारामती येथील गट नंबर ४१४/२ मधील ६.०० हे. आर. इतकी जमीन प्रतिग्रहित्या संस्थेकडून व प्रतिग्रहित्या संस्थेच्या लाभार्थ्याकडून विनावापर राहिलेली असल्याने पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांनी ठराव क्र. ७००२, दि. २६/०८/२०२१ अन्वये सदरची जमीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयाच्या विस्तारीकरण प्रयोजनासाठी हस्तांतरित करण्यास सहमती दिलेली आहे. यास्तव, महसूल व वन विभागाच्या दि. १६/०२/१९८५ व दि.०८/०९/२००८ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांना प्रदान केलेली मौजे मेडद, बारामती येथील गट नं. ४१४/२ मधील ६.०० हे. आर. इतकी जमीन पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांच्याकडून काढून घेण्यास मान्यात देण्यात आली आहे.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांच्याकडून काढून घेण्यात आलेली मौजे मेडद, ता. बारामती येथील गट क्र. ४१४/२ मधील ६.०० हे. आर. इतकी जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२-अ, कलम ४०, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम ५ व ६ मधील तरतुदीनुसार, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती व संलग्नित रूग्णालयाच्या विस्तारीकरणांतर्गत "हर्बल गार्डन तयार करणे, तसेच राष्ट्रीय स्तरावरील आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय बनविण्याचे अनुषंगाने आयुर्वेद औषधी निर्माण करण्यासाठी (Government Ayurved Pharmacy), आयुष संचालनालयाअंतर्गत विविध शाखांच्या (होमिओपॅथी, युनानी, योग व निसर्गोपचार) महाविद्यालयांची एकाच परिसरामध्ये उभारणी करणे, विशेष पंचकर्म केंद्र स्थापन करणे" या शासकीय / सार्वजनिक प्रयोजनासाठी खालील विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीनतेने महसूल मुक्त किंमतीने व भोगवटामूल्यरहित पध्दतीने कब्जेहक्काने संचालक, आयुष, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या उक्त प्रयोजनासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग यांना प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

५. त्याअर्थी, शासन ज्ञापन दि. १०/०६/२०२२ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२-अ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ च्या नियम ५ व ६ मधील तरतुदीनुसार मी, डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे मौजे मेडद, ता. बारामती, येथील गट क्रमांक ४१४/२ मधील ०६.०० हे. आर. इतकी जमीन पुणे गृहमिर्नाण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांचेकडून काढून घेऊन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती व संलग्नित रूग्णालयाच्या विस्तारीकरणांतर्गत "हर्बल गार्डन तयार करणे, तसेच राष्ट्रीय स्तरावरील आयुर्वेद महाविद्यालय व रूग्णालय बनविण्याचे अनुषंगाने आयुर्वेद औषधी निर्माण करण्यासाठी (Government Ayurved Pharmacy), आयुष संचालनालयाअंतर्गत विविध शाखांच्या (होमिओपॅथी, युनानी, योग व निसर्गोपचार) महाविद्यालयांची एकाच परिसरामध्ये उभारणी करणे, विशेष पंचकर्म केंद्र स्थापन करणे" या शासकीय / सार्वजनिक प्रयोजनासाठी महसूल मुक्त किंमतीने व भोगवटामूल्यरहित पध्दतीने कब्जेहक्काने संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या उक्त प्रयोजनासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग यांना खालील नमूद अटी व शर्तीस अधिन राहून प्रदान करीत आहे.

<u>अटी व शर्ती-</u>

१) विषयांकित जमीन संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या विचाराधीन प्रयोजनासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग (संचालक, आयुष, संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई) हे **भोगवटादार वर्ग २** म्हणून धारण करतील.

Dean
Govt. Ayurved College & Hospital
Baramati, Dist. Pune

२) शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पुर्व परवानगीशिवाय सदर जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबंध विक्री/देणगी देऊन/अदला बदल करून/गहाण ठेऊन/पट्टयाने देऊन/खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाह्य यंत्रणेव्दारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करता येणार नाही. सदर जमिनीवर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती / संस्था/कंपनी इत्यादींचे कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण होतील अशा प्रकारे कोणताही आर्थिक व्यवहार करता येणार नाही. तसेच शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पुर्वमान्यतेशिवाय सदर जमिनीचे पोट विभाजन करता येणार नाही.

३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग (संचालक, आयुष, संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई) हे विषयांकित शासकीय जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठी करतील. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरूपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पुर्वमान्यता आवश्यक राहील.

४) विषयांकित जमिनीची मोजणी व डिमार्केशन, प्रतिग्रहिता विभागाने संबंधित उप-अधिक्षक, भुमी अभिलेख यांच्याकडून करणे बंधनकारक राहील.

५) विषयांकित जमिनीवर संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या विहीत परवानगीने व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास होणे बंधनकारक राहील. तसेच या व्यतिरिक्त अन्य संबंधित विभाग / शासकीय यंत्रणा यांची मान्यता / पुर्वपरवानगी / नाहरकत घेणे देखील बंधनकारक राहील.

६) सदर जमीनीची ताबा मिळाल्यापासून **३ वर्षाच्या** आत मंजूर प्रयोजनासाठी वापर सुरू करणे बंधनकारक राहील.

७) सदर जमिनीवरील नियोजित प्रयोजनामुळे लगतच्या खातेदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, वा त्यांच्या वैध वहीवाटीस बाधा येणार नाही याबाबत आवश्यक ती दक्षता प्रतिग्रहिता विभागाने घ्यावयाची आहे.

८) प्रस्तुत जमिनीस शासकीय जमीन मंजुरी संदर्भातील इतर नियमित अटी व शर्ती या ठिकाणी लागू राहतील.

९) प्रस्तुत जमिनीचे संरक्षण, देखभाल करण्याची जबाबदारी प्रतिग्रहीता यांची राहील.

१०) पर्यावरणाच्या पुर्नस्थापनेसाठी व पर्यावरण संतुलन कायम राखण्याच्या दृष्टीने विषयांकित जागेत आवश्यक तेथे वृक्ष लागवड करणे बंधनकारक राहील.

११) विषयांकीत जागेबाबत महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. मुद्रांक-२०१७/अनौ.क्र.११/प्र.क्र.१३३/म-१ (धोरण) दि. २४/१२/२०२० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

१२) प्रतिग्रहीता यांनी उक्त जमीन ताब्यात घेतल्यानंतर नमुना-१८ प्रमाणे जागेवर नावाचा बोर्ड लावणे बंधनकारक राहील.

१३) विषयांकित जमिन अथवा जमिनीचा काही भाग शासनाच्या महत्वाच्या प्रयोजनासाठी आवश्यक वाटल्यास प्रतिग्रहीता यांना पुर्व कल्पना न देता विनाशर्त व विनामोबदला परत काढून घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune

[illegible]

[illegible]

(डॉ. राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी, पुणे

प्रति, संचालक आयुष, आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग.

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती व संलग्नित रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी अतिरिक्त जमीन उपलब्ध करून देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन ज्ञापन क्र.जमीन ३४२१/१३२५/प्र.क्र.२८३/ज-५
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०००३२.
दि.१०/०६/२०२२

वाचा :-

१. विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.मह/२/जमीन-पुणे/एसआर/५३/२०२१, दि.१८/११/२०२१ व दि.१८/०२/२०२२.
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग शासन निर्णय क्र.एएमसी-२०२१/प्र.क्र.१४७/२१/शिक्षण-१, दि.२०/०७/२०२१.
३. महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन क्र.जमीन ३४२१/५९४/प्र.क्र.१२९/ज-५, दि.०६/१०/२०२१.
४. जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयीन आदेश क्र.पमअ/सीआर/३९६/२००२, दि.१८/०६/२००२.
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एलजीएल १०८१/८७४४/सीआर.१४४७/ग-५, दि.१६/०२/१९८५.
६. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.जमीन ०४/२००६/प्र.क्र.३५/ज-१, दि.०८/०९/२००८.
७. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१, दि.१२/०७/२०११.

प्रस्तावना:-

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ वरील दि.२०/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्र शासन व भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद (CCIM) नवी दिल्ली यांच्या मान्यतेच्या अधीन राहून मौजे मेडद, ता. बारामती, जि. पुणे येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित १०० रुग्णखाटांचे आयुर्वेद रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन मान्यतेनुसार संदर्भाधीन क्र.३ वरील दि.०६/१०/२०२१ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये मौजे मेडद, ता. बारामती येथील गट क्र. ४१४/१ मधील ५.८७ हे.आर. इतकी शासकीय गायरान जमीन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग (संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांना प्रदान करण्यात आलेली आहे.

आता सदर शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयाच्या विस्तारीकरणांतर्गत हर्बल गार्डन तयार करणे, तसेच राष्ट्रीय स्तरावरील आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय बनविण्याचे अनुषंगाने आयुर्वेद औषधी निर्माण करण्यासाठी (Government Ayurved Pharmacy), आयुष संचालनालयाअंतर्गत विविध शाखांच्या (होमिओपॅथी, युनानी, योग व निसर्गोपचार) महाविद्यालयांची एकाच परिसरामध्ये उभारणी करणे, विशेष पंचकर्म केंद्र स्थापन करणे इ. बाबींसाठी संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी बारामती तालुक्यामध्ये मौजे मेडद, ता. बारामती, जि. पुणे येथील पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) पुणे यांच्या ताब्यातील गट नंबर ४१४/२ मधील ६ हे. ०० आर. एवढी जमीन उपलब्ध करून देणेबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांनी संदर्भाधीन क्र.०१ वरील पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

Dean
Govt. Ayurved College & Hospital
Baramati, Dist. Pune

शासन ज्ञापन:-

संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या सदर जागा मागणीच्या पार्श्वभुमीवर विभागीय आयुक्त, पुणे यांनी कळविल्यानुसार पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांना संदर्भाधीन क्र.४ वरील कार्यालयीन आदेशाद्वारे प्रदान केलेली मौजे मेडद, बारामती येथील गट नं.४१४/२ मधील ६.०० हे.आर. इतकी जमीन प्रतिग्रहित्या संस्थेकडून व प्रतिग्रहित्या संस्थेच्या लाभार्थ्यांकडून विनीवापर राहिलेली असल्याने पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांनी ठराव क्र. ७००२, दि.२६/०८/२०२१ अन्वये सदरची जमीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयाच्या विस्तारीकरण प्रयोजनासाठी हस्तांतरीत करण्यास सहमती दिलेली आहे. यास्तव, महसूल व वन विभागाच्या दि.१६/०२/१९८५ व दि.०८/०९/२००८ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांना प्रदान केलेली मौजे मेडद, बारामती येथील गट नं.४१४/२ मधील ६.०० हे.आर. इतकी जमीन पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांच्याकडुन काढुन घेण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा), पुणे यांच्याकडुन काढून घेण्यात आलेली मौजे मेडद, ता. बारामती येथील गट क्र. ४१४/२ मधील ६.०० हे. आर. इतकी जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२-अ, कलम ४०, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम ५ व ६ मधील तरतुदीनुसार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती व संलग्नित रुग्णालयाच्या विस्तारीकरणांतर्गत "हर्बल गार्डन तयार करणे, तसेच राष्ट्रीय स्तरावरील आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय बनविण्याचे अनुषंगाने आयुर्वेद औषधी निर्माण करण्यासाठी (Government Ayurved Pharmacy), आयुष संचालनालयाअंतर्गत विविध शाखांच्या (होमिओपॅथी, युनानी, योग व निसर्गोपचार) महाविद्यालयांची एकाच परिसरामध्ये उभारणी करणे, विशेष पंचकर्म केंद्र स्थापन करणे" या शासकीय/सार्वजनिक प्रयोजनासाठी खालील विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीनतेने महसूलमुक्त किंमतीने व भोगवटामूल्यरहित पध्दतीने कब्जेहक्काने संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या उक्त प्रयोजनासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग यांना प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१) विषयांकित जमीन संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या विचाराधीन प्रयोजनासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग (संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई) **भोगवटादार वर्ग-२** म्हणून धारण करेल.

२) शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय सदर जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबंध विक्री/देणगी देऊन/अदला बदल करुन/गहाण ठेऊन/पट्ट्याने देऊन/खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाह्य यंत्रणाद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करता येणार नाही. सदर जमिनीवर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती/संस्था/कंपनी इत्यादींचे कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण होतील अशा प्रकारे कोणताही आर्थिक व्यवहार करता येणार नाही. तसेच शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय सदर जमिनीचे पोट विभाजन करता येणार नाही.

Dean
Govt. Ayurved College & Hospital

३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग/ संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे विषयांकित शासकीय जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठी करील. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरुपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पूर्वमान्यता आवश्यक राहील.

४) सदर जमिनीचा ताबा मिळाल्यापासून ३ वर्षांच्या आत मंजूर प्रयोजनासाठी वापर सुरु करणे बंधनकारक राहील.

५) विषयांकित जमिनीवर संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या विहित परवानगीने व मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास होणे बंधनकारक राहील. तसेच या व्यतिरिक्त अन्य संबंधित विभाग/शासकीय यंत्रणा यांची मान्यता/पूर्वपरवानगी/ना-हरकत घेणे देखील बंधनकारक राहील.

६) विषयांकीत जागेची मोजणी व डिमार्केशन प्रतिग्रहिता विभागाने संबंधित उप अधीक्षक, भुमी अभिलेख यांच्याकडून करणे बंधनकारक राहील.

७) सदर जमिनीवरील नियोजित प्रयोजनामुळे लगतच्या खातेदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, त्यांच्या वैध वहीवाटीस बाधा येणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

८) शासकीय जमीन मंजूरी संदर्भातील इतर नियमित अटी व शर्ती या ठिकाणी लागू राहतील.

९) जिल्हाधिकारी, पुणे यांना स्थिती-कालानुरूप आवश्यक वाटतील अशा अन्य अटी व शर्ती विहित करण्याची मुभा राहील.

१०) वरील अटी/शर्तीपैकी कोणत्याही अटी/शर्तीचा भंग झाल्यास शर्तभंगाबाबत सदर जमीन शासन जमा करण्याचा अधिकार शासनास राहील.

सदर शासन ज्ञापन वित्त विभागाने त्यांच्या अनौ.सं.क्र.१२८/२०२२/व्यय-९, दि.३१/०३/२०२२ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(श्रीराम यादव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
जिल्हाधिकारी, पुणे.

प्रति,
१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा/परिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (वित्त)/सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०) विभागीय आयुक्त, पुणे.

Dean
Govt. Ayurved College & Hospital
Baramati, Dist. Pune

११) संचालक आयुष, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१२) मुख्य अधिकारी,पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, आगरकर रोड, पुणे - ४११००१.

१३) जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे.

१४) मा.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई (१).

१५) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग (का-शिक्षण-१)/ वित्त विभाग (का-व्यय ९)/गृहनिर्माण विभाग(कार्यासन गृनिभू), मंत्रालय, मुंबई.

१६) निवडनस्ती, कार्यासन ज-५, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune